# जनसंपर्क अधिकारी

**मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- २६७/२०२२ दिनांक :- ३१/०८/२०२२

## INSTAGRAM ॲपद्वारे मुलगी असल्याचे भासवून मुलींचे अश्लिल फोटो व व्हिडीओ घेवून ते प्रसारीत करण्याची धमकी देणाऱ्या आरोपींना पकडण्यात सायबर गुन्हे कक्षास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत काशिमीरा पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारी अल्पवयीन मुलगी वय १२ वर्षे हीला अनोळखी मुलीच्या नावाने इंस्टाग्राम आयडी वर मेसेजेस येत होते. सदर व्यक्तीने अल्पवयीन मुलीस इंस्टाग्रामवर बोलण्यात गुंतवून तीचेसोबत अश्लिल चॅटींग सुरु केली. तसेच नग्न फोटो काढण्यास सांगितले व सदरचे फोटो इस्टाग्राम आयडीवर मागून घेतले. त्यानंतर सदर व्यक्तीने वारंवार अल्पवयीन मुलीस नग्न फोटो पाठविण्यास सांगितले व फोटो न पाठविल्यास पुर्वी पाठविलेले फोटो व्हायरल करण्याची धमकी देवून ब्लॅकमेल करण्याची धकमी दिली असलेबाबतचा तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे दिनांक २७/०८/२०२२ रोजी चौकशीकरीता प्राप्त झाला होता.

सदर अर्जाबाबत सायबर गुन्हे कक्ष येथील अधिकारी व अंमलदार यांनी इन्स्टाग्रामद्वारे तांत्रीक चौकशी करुन माहिती प्राप्त केली असता नमूद प्राप्त माहितीमध्ये सदर इंस्टाग्राम हे तौसीफ मोनिश खान, वय - २१ वर्षे, मिरारोड (पुर्व), हा वापरत असल्याचे निष्पन्न झाले. नमूद इसमाला ताब्यात घेवून त्याचेकडे सखोल चौकशी करुन त्याचे मोबाईलची पडताळणी केली असता नमूद इसमाने सदरचा गुन्हा केल्याचे कबुली दिली आहे. नमूद इसमास ताब्यात घेवून त्याचेविरुध्द काशिमीरा पोलीस ठाणे येथे दिनांक २९/०८/२२ रोजी गु.र.क्र. ५९३/२२ भा.द.वि. कलम ३८४, ३५४ अ (१) (ii), ३५४ ड (२) सह बालकांचे लैगिंक अपराधांपासुन बालकांचे संरक्षण अधिनियम कायदा कलम ११,१२ व माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (क), ६६(ई), ६७(ब) या कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तरी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, वर इन्स्टाग्राम आयडी वरुन आपल्यासोबत असा प्रकार घडलेला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अती. कार्य. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोलीस अंमलदार/ प्रविण आव्हाड, गणेश इलग, महीला पोलीस अंमलदार/ पल्लवी निकम , अमिना पठाण यांनी पार पाडली आहे.

..........oooooo..........